NAAC A++ Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषय : पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने **RAC** च्या बैठका वेळेत पार पाडण्याबाबत..

सर्व अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक यांना कळविणेत येते की, पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने **RAC** यांच्या बैठका वेळोवेळी आयोजित करणे व सर्व संशोधक विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रियेमधिल मुलाखत प्रक्रिया, सिनॉपसिस मंजूरी, मार्गदर्शक नियुक्ती, कच्च्या प्रबंधांची छाननी, त्याचप्रमाणे मार्गदर्शक बदलाची प्रक्रिया, प्रोग्रेस रिपोर्ट प्रेझेंटेशन (प्रत्येक सहामाहीकरिता) इत्यादी सर्व प्रक्रिया विहित मुदतीत पार पाडणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नांवनोंदणीबाबतचे प्रस्ताव व मार्गदर्शक बदल याबाबतचे प्रस्ताव संशोधन व मान्यता समितीसमोर अंतिम मान्यतेसाठी ठेवले जात असल्याने, सदरची कार्यवाही तातडीने पूर्ण होणे आवश्यक आहे.

त्यासंदर्भात वार्षिक वेळापत्रकामध्ये तसेच परिपत्रकाव्दारे वेळोवेळी कळवूनही ब—याच अधिविभागाकडून उपरोक्त कार्यवाहीशी निगडीत प्रकरणे प्रलंबीत राहताना दिसून येत आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांची निवेदने/ तक्रारी प्राप्त होत आहे.

तेव्हा **RAC** यांच्या मान्यतेसाठी येणा—या सर्व प्रकरणाबाबत तात्काळ कार्यवाही पूर्ण करून पीजीबीयुटीआर विभागास सदर प्रकरणे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात यावीत.

सोबत या विभागाचे दि. २६/१०/२०२१ रोजीचे परिपत्रक माहितीसाठी जोडले आहे. सदर बाबत विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार, न्यायालयीन प्रकरण, माहिती अधिकार अर्ज प्राप्त झालेस यास पूर्णपणे संबंधित अधिविभाग जबाबदार राहिल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आदेशावरून,

कुलसचिव

सोबत:— वरीलप्रमाणे

जा.क्र. शिवाजी विद्या./पीजी—बीयुटीआर/एम.फिल—पीएच.डी./212

दि. 02 FEB 2024

प्रत,

१. सर्व अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक, पदव्युत्तर अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. सर्व पीएच.डी. समन्वयक, पदव्युत्तर अधिविभाग.

३. मा. कुलगुरू व प्र—कुलगुरू कार्यालय